प्रेसनोट दि.- ०९/११/२०१७

स्वारगेट वाहतुक विभाग, पुणे शहर दि.- ०८/११/२०१७

विषय - **बनावट ई-चलन मेसेज द्वारा पोलीसांना फसविनारा पोलीसांच्या जाळ्यात**

दिनांक ०८/११/२०१७ रोजी सेव्हन लव्हज चौकात स्वारगेट वाहतुक विभागाकडील पोलीस निरीक्षक एस बी पाचोरकर कर्मचा-यासह वाहन तपासणी करीत असताना वाहन चालक असिफ अरीफ शेख रा.कोंढवा याने त्याच्या मोबाईल वरील मॅसेज दाखवुन आगोदरच दंड भरल्याचे सांगितले. करीता पोलीसांना नमुद मोबाईल मॅसेजचा संशय आलेने त्याने तो बारकाईने पाहीला असता तो बनावट असलेचे दिसुन आले, करीता पोलीसांनी मॅसेज पाठविणारा इसम नामे अजिज मोहम्मंद शेख रा.झांबरे पॅलेस महर्षीनगर पुणे यांस घटनास्थळी बोलावुन त्याचा मोबाईल तपासले असता मोबाईलच्या मॅसेज इनबॉक्स मध्ये त्याने ३९ लोंकाना एकुन ३९९ बनावट मॅसेज पाठवल्याचे आढळुन आले

इसम नामे अजिज मोहम्मंद शेख रा.झांबरे पॅलेस महर्षीनगर पुणे याने स्वत:चे मोबाईल हॅन्डसेटवर पुणे पोलीस ई चलनद्वारे पाठवितात त्या सारखे दंड भरल्याचे बनावट मॅसेज तयार करुन ३९ लोंकाचे मोबाईल क्रमाकावर पाठवले ते मॅसेज बनावट आहेत हे माहीत असुनही वाहन तपासणी करणारे वाहतुक पोलीसांना दाखवुन ते दंडात्मक कारवाई केलेचे खरे मॅसेज असल्याचे भासवुन पोलीसांचे व शासनाचे अर्थिक फसवणुक केली आहे.जुन २०१७ ते ०८/११/२०१७ पावेतो नमुद इसमाने ३९९ बनावट मॅसेज तयार करुन शासनाचे ८१,२१२/४६ रु./- इतकी फसवणुक केली आहे.

याबाबत स्वारगेट पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या कामगिरीत शेषराव सुर्यवंशी पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा पुणे शहर व देवीदास पाटील सहा पोलीस आयुक्त परि-२ वाहतुक शाखा यांचे मार्गदर्शनाखाली सुदाम पाचोरकर पोलीस निरीक्षक स्वारगेट वाहतुक विभाग पो.ना.क्षिरसागर,पो.शि.जगताप व मपोशि कोंडे यांनी भाग घेतला होता.

पुढील तपास पोलीस निरीक्षक मच्छीद्र पंडीत स्वारगेट पोलीस स्टेशन हे करीत आहेत......